# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

लोकमत पुणे, मंगळवार, दि. २८ नोव्हेंबर २०१७ ४

# भारतीय संविधान सर्व कायद्यांची जननी

## वाय. जे. तांबोळी : राजगुरुनगरला संविधान दिनानिमित्त कायदेविषयक शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : सर्व कायद्यांची जननी असणारे भारतीय संविधान हे दूरदृष्टीच्या, अभ्यासू, व्यासंगी अशा लोकप्रतिनिधींनी घटना समितीत सखोल आणि सांगोपांग चर्चा करून तयार केले असून, ते स्वतंत्र भारताच्या लोकशाहीचे निदर्शक आहे आणि याचे सर्व श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जाते, असे प्रतिपादन खेड सत्र न्यायालयाचे कनिष्ठ स्तर सह दिवाणी न्यायाधीश वाय. जे. तांबोळी यांनी केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात खेड सत्र न्यायालय, खेड बार असोसिएशनच्या वतीने संविधान दिनानिमित्त आयोजित कायदेविषयक शिबिरात 'भारतीय संविधान' या विषयावर ते बोलत होते. या प्रसंगी खेड सत्र न्यायालयाचे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश एस. डी. दाभाडे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक ॲड. मुकुंदराव आवटे, बाबासाहेब सांडभोर, ॲड. माणिक पाटोळे, राजगुरुनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अनिल राळे, उपाध्यक्ष ॲड. अश्विनी पडके-पानसरे, ॲड. संदीप घुले, सचिव ॲड. गणेश गाडे, प्राचार्य डॉ. एस.बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी.जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

तांबोळी यांनी पुढे म्हणाले, न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही आपल्या संविधानाची मूलभूत चौकट असल्याचे सांगितले. त्यांनी भारतीय राज्यघटनेची मूलभूत वैशिष्ट्ये, राज्यघटनेचे विभाग, एकूण कलमे, परिशिष्टे, मार्गदर्शक तत्त्वे, नागरिकांचे मूलभूत हक्क आणि कर्तव्ये याबद्दल माहिती दिली आणि संविधानाची ओळख करून घेण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन केले.



संविधान या विषयावर बोलताना खेड सत्र न्यायालयाचे कनिष्ठ स्तर सह दिवाणी न्यायाधीश वाय. जे. तांबोळी.

- ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील म्हणाले, की कायद्याच्या राज्याची लोकशाहीने लोकांना दिलेली सनद म्हणजे आपले संविधान आहे. यामधून व्यक्तीच्या मूलभूत हक्कांप्रति काळजी घेतली आहे. ही गोष्ट सामाजिक क्रांतीला पोषक आहे.
- ॲड. किरण दौंडकर यांनी सायबर क्राईम या विषयावर बोलताना समाजमाध्यमांच्या माध्यमातून कोणाच्या भावना दुखावतील अशी शेरेबाजी करणे, समाजमाध्यमांवर बनावट खाती तयार करून कोणाची बदनामी होईल अशा गोष्टी प्रसारित करणे, अश्लील संदेश पाठविणे, दुसऱ्याची परवानगी नसताना त्याच्या पासवर्डचा दुरुपयोग करून त्याच्या खात्यावर व्यवहार करणे आदी मुद्द्यांबाबत माहिती दिली.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये कुठेही कसलेही भांडण झाले किंवा विद्यार्थ्यांना असुरक्षित वाटेल असे वातावरण निर्माण झाले तरी त्याची रॅगिंग म्हणून नोंद होऊ शकते. कोणालाही मानसिक, शारीरिक त्रास देऊ नये, त्याच्या व्यक्तिमत्त्वाला बाधा आणू नये नाहीतर रॅगिंग प्रतिबंधक कायद्यानुसार शिक्षा व दंडात्मक कारवाई होऊ शकते.

- ॲड. माणिक पाटोळे

या प्रसंगी भारताच्या संविधानातील उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच खेड तालुका विधी सेवा समितीच्या वतीने घेण्यात आलेल्या विधी सेवा प्राधिकरणासंदर्भातील निबंध स्पर्धेतील प्रथम क्रमांक प्राप्त कीर्ति, द्वितीय क्रमांक योगेश नाईकडे, तृतीय क्रमांक स्नेहल शिंदे या विद्यार्थ्यांना न्यायाधीश एस. डी. दाभाडे यांच्या हस्ते प्रशस्तिपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले.

सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी केले. प्रास्ताविक ॲड. अनिल राळे यांनी केले तर आभार प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी मानले.

पुढारी | पुणे, मंगळवार २८ नोव्हेंबर २०१७

# भारतीय संविधान सर्व कायद्यांची जननी

## खेड प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी तांबोळी यांचे प्रतिपादन

**राजगुरुनगर, दि. २७ (प्रतिनिधी)** - भारतीय संविधान सर्व कायद्यांची जननी असून भारतीय संविधान हे द्रष्ट्यांच्या, अभ्यासू, ज्ञानी अशा लोकप्रतिनिधींनी घटना समितीत सखोल आणि सांगोपांग चर्चा करून तयार केले आहे. ते स्वतंत्र भारताच्या लोकशाहीचे निदर्शक आहे आणि याचे सर्व श्रेय डॉ. आंबेडकर यांना जाते, असे प्रतिपादन खेड प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती जे. तांबोळी यांनी केले.

राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात खेड सत्र न्यायालय, खेड बार असोसिएशन यांच्या वतीने संविधान दिनाचे आयोजन केले होते. यानिमित्ताने आयोजित कायदेविषयक शिबिरात भारतीय संविधान या विषयावर तांबोळी बोलत होते. यावेळी राजगुरुनगर जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे दिवाणी न्यायाधीश एस. डी. दाभाडे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक अ‍ॅड. मुकुंद आवटे, बाळासाहेब सांडभोर, अ‍ॅड. माणिक पाटोळे, राजगुरुनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष अ‍ॅड. अनिल राक्षे, उपाध्यक्ष अ‍ॅड. अश्विनी पडळे-पानसरे, अ‍ॅड. संदीप घुले, सचिव अ‍ॅड. गणेश गाडे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. बी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. अ‍ॅड. माणिक पाटोळे म्हणाले की, महाविद्यालयातील विद्यार्थिनींचे कुठेही कोणत्याही स्वरूपात शोषण झाले किंवा विद्यार्थ्यांना असुरक्षित वाटेल असे वातावरण निर्माण झाले तरी त्याची रॅगिंग म्हणून नोंद होऊ शकते, असे त्यांनी नमूद केले. अ‍ॅड. किरण टाकळकर [illegible] सोशल मीडियाबाबत माहिती दिली. दरम्यान, भारताच्या संविधानातील उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच खेड तालुका विधी सेवा समितीच्या वतीने घेण्यात आलेल्या विधी सेवा प्राधिकरणासंदर्भातील निबंध स्पर्धेतील प्रथम क्रमांक प्रणाली दौंडे, द्वितीय योगेश नाईकरे, तृतीय क्रमांक स्नेहल शिंदे या विद्यार्थ्यांना न्यायाधीश एस. डी. दाभाडे यांच्या हस्ते प्रशस्तिपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रास्ताविक अ‍ॅड. अनिल राक्षे तर डॉ. एस. बी. पाटील यांनी आभार मानले.



**राजगुरुनगर :** येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात संविधान दिनानिमित्ताने भारताच्या संविधानातील उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

> कायद्याच्या राज्याची लोकांनीच लोकांना दिलेली सनद म्हणजे आपले संविधान आहे. संविधान हे केवळ सत्तेचे कायदे ग्रंथित केलेले पुस्तक नसून त्यामधून व्यक्तीच्या मूलभूत हक्कांप्रती कमालीची काळजी घेतली आहे ही गोष्ट सामाजिक क्रांतीला पोषक आहे.
>
> **-अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील,** अध्यक्ष, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ

केसरी, पुणे २७ नोव्हेंबर २०१८

# भारतीय संविधान सर्व कायद्यांची जननी : न्यायाधीश तांबोळी



राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात संविधानाचे सामुहिक वाचन करताना मान्यवर.

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** सर्व कायद्यांची जननी असणारे भारतीय संविधान हे दूरदृष्टीच्या, अभ्यासू, ध्यासंगी अशा लोकप्रतिनिधींनी घटनासमितीत सखोल आणि सांगोपांग चर्चा करून तयार केले आहे. ते स्वतंत्र भारताच्या ध्येयवादाचे निदर्शक आहे आणि याचे सर्व श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जाते, असे प्रतिपादन खेड सत्र न्यायालयाचे कनिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश वाय. जे. तांबोळी यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात खेड सत्र न्यायालय, खेड बार असोसिएशन यांच्या वतीने संविधान दिनानिमित्त आयोजित कायदेविषयक शिबिरात 'भारतीय संविधान' विषयावर बोलत होते.

यावेळी खेड सत्र न्यायालयाचे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश एस. डी. दाभाडे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक ॲड. मुकुंदराव आवटे, बाळासाहेब सांडभोर, ॲड. मनिषा पवळे, राजगुरुनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अनिल राक्षे, उपाध्यक्ष ॲड. आश्विनी मडके-पानसरे, ॲड. संदिप घुले, सचिव ॲड. गणेश गाडे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी.जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे आणि विद्यार्थी उपस्थित होते.

न्यायाधीश तांबोळी म्हणाले, न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही आपल्या संविधानाची मूलभूत चौकट आहे. याशिवाय त्यांनी 'भारतीय राज्यघटनेची मूलभूत वैशिष्ट्ये, राज्यघटनेचे विभाग, एकूण कलमे, परिशिष्टे, मार्गदर्शक तत्वे, नागरिकांची मूलभूत हक्क आणि कर्तव्ये याबद्दल माहिती देत संविधानाची ओळख करून घेण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन केले.

दरम्यान भारतीय संविधानातील उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. तसेच खेड तालुका विधी सेवा समितीच्या वतीने घेण्यात आलेल्या विधी सेवा प्राधिकरणासंदर्भातील निबंध स्पर्धेतील प्रथम क्रमांक प्रगती थोरे, द्वितीय क्रमांक योगेश लांडगे, तृतीय क्रमांक रोहन शिंदे या विद्यार्थ्यांना न्यायाधीश एस. डी. दाभाडे यांच्या हस्ते प्रशस्तिपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी केले. प्रास्ताविक ॲड. अनिल राक्षे यांनी केले. तर आभार प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख